आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२३ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीत महायुतीची दणदणीत आघाडी

- महाविकास आघाडीला मोठा फटका

- जाहीर निकालांमधे भाजपाला ७, शिवसेनेला ५ तर राष्ट्रवादी काँग्रेसला ४ जागांवर यश, एका मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा उमेदवार विजयी

- झारखंड विधानसभा निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चा सर्वात मोठा पक्ष

**आणि**

- महसूल गुप्तचर संचालनालयाच्या कारवाईत मुंबई विमानतळावर ३५ कोटी रुपये किमतीचं सुमारे साडे तीन किलो कोकेन जप्त, एका संशयिताला अटक

**<><><><><>**

सध्या हाती आलेल्या कलांनुसार राज्य विधानसभा निवडणुकीत महायुती आघाडीवर असल्याचं दिसतंय. महायुतीतले प्रमुख घटक पक्ष आतापर्यंत २१० जागांवर आघाडीवर आहेत. त्यात भाजपा १२१, शिवसेना ४९ आणि राष्ट्रवादी काँग्रेस ३६ जागांवर पुढे आहे.

तर महाविकास आघाडीतले प्रमुख घटक ५४ जागांवर आघाडीवर आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष २०, काँग्रेस १९ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ११ जागांवर पुढे आहे.

**<><><><><>**

**पश्चिम महाराष्ट्रतली परिस्थिती जाणून घेऊया**

**संगमनेरमध्ये** मतमोजणीच्या बाराव्या फेरीअखेर **शिवसेनेच्या** **अमोल खताळ** आघाडीवर आहेत. **शिर्डीमध्ये** मतमोजणीच्या एकोणिसाव्या फेरीअखेर **भाजपाचे** **राधाकृष्ण विखे पाटील** यांचा विजय निश्चित झाला आहे. **श्रीरामपूर** मतदार संघात मतमोजणीच्या सोळाव्या फेरीअखेर **काँग्रेसचे** **हेमंत ओगले** आघाडीवर आहेत. **कर्जत जामखेडमध्ये** मतमोजणीच्या तेराव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाचे** **रोहित पवार** आघाडीवर आहेत.

**कागलमध्ये** मतमोजणीच्या तेराव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेसचे** **हसन मुश्रीफ** आघाडीवर आहेत. **कोल्हापूर उत्तरमध्ये** मतमोजणीच्या चौदाव्या फेरीअखेर **शिवसेनेचे** **राजेश क्षीरसागर** आघाडीवर आहेत. **शाहुवाडी**मध्ये मतमोजणीच्या सतराव्या फेरीअखेर **जनसुराज्य पक्षाचे** **विनय कोरे** आघाडीवर आहेत.

**इस्लामपूरमध्ये** मतमोजणीच्या विसाव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाचे** **जयंत पाटील** यांचा विजय निश्चित झाला आहे. **पलूस- कडेगावमध्ये** मतमोजणीच्या चौदाव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेस चे** **विश्वजीत कदम** आघाडीवर आहेत.

**तासगाव- कवठेमहांकाळमध्ये** मतमोजणीच्या चौदाव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाचे** **रोहित पाटील** आघाडीवर आहेत.

जतमध्ये मतमोजणीच्या तेराव्या फेरीअखेर **भाजपाचे** **गोपिचंद पडळकर** आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

**सिंदखेडराजा** मतदार संघात २२ व्या फेरीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोज कायंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राजेंद्र शिंगणे यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**बडनेरा** मतदार संघात मतमोजणीच्या १७ व्या फेरीअखेर राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा आघाडीवर आहेत.

**तिवसा** मतदार संघात मतमोजणीच्या १२ व्या फेरीअखेर भाजपाचे राजेश वानखेडे काँग्रेसच्या यशोमती ठाकूर यांच्या पेक्षा ७ हजार २५४ मतांनी आघाडीवर आहेत.

**अचलपूर** मतदार संघात मतमोजणीच्या २१ व्या फेरीअखेर भाजपाचे उमेदवार प्रवीण तायडे त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे उमेदवार अनिरुद्ध देशमुख यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**काटोल** मतदार संघात मतमोजणीच्या ८ व्या फेरीअखेर भाजपाचे चरणसिंग ठाकूर त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सलील देशमुख यांच्या पेक्षा २० हजार ८८४ मतांनी आघाडीवर आहेत.

**नागपूर दक्षिण पश्चिम** मतदार संघात मतमोजणीच्या १९ व्या फेरीअखेर भाजपाचे उमेदवार देवेंद्र फडणवीस २६ हजार ४०६ मतांनी आघाडीवर आहेत.

**नागपूर उत्तर** मतदार संघात मतमोजणीच्या १० व्या फेरीअखेर काँग्रेसचे नितिन राऊत भाजपाचे मिलिंद माने यांच्या पेक्षा १० हजार २५२ मतांनी आघाडीवर आहेत.

**कामठी** मतदार संघात मतमोजणीच्या १३ व्या फेरीअखेर भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे काँग्रेसचे उमेदवार सुरेश भोयर यांच्या पेक्षा २ हजार ७८२ मतांनी आघाडीवर आहेत.

**साकोली** मतदार संघात १४ व्या फेरीनंतर काँग्रेसचे नाना पटोले भाजपाचे अविनाश ब्राह्मणकर यांच्यापेक्षा आघाडीवर आहे.

**<><><><><>**

राज्य विधानसभेच्या २८८पैकी १२ जागांचे निकाल स्पष्ट झाले आहेत.

अकोला पूर्व मतदारसंघात भाजपाचे उमेदवार रणधीर सावरकर विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गोपाळ दातकर यांना ५६,६१३ मतांनी पराभूत केलं. सावरकर यांना १ लाख ८ हजार ६१९, तर दातकर यांना ५८ हजार ६ मतं मिळाली. वंचित बहुजन आघाडीचे ज्ञानेश्वर सुलताने तिसऱ्या क्रमांकावर राहिले, त्यांना ५० हजार ६८१ मतं मिळाली.

शहादा मतदारसंघात भाजपाचे राजेश पाडवी विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे राजेंद्रकुमार गावीत यांचा ५३ हजार २०४ मतांनी पराभव केला. पाडवी यांना १ लाख ४६ हजार ८३९, तर गावीत यांना ९३ हजार ६३५ मतं मिळाली. अपक्ष उमेदवार गोपाळ भंडारी तिसऱ्या क्रमांकावर राहिले. त्यांना २,३९६ मतं मिळाली.

घाटकोपर पूर्व मतदारसंघात भाजपाचे पराग शहा विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राखी जाधव यांना ३४ हजार ९९९ मतांनी पराभूत केलं. शहा यांना ८५ हजार ३८८, तर जाधव यांना ५० हजार ३८९ मतं मिळाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संदीप कुलथे तिसऱ्या क्रमांकावर राहिले. त्यांना ५ हजार ६१५ मतं मिळाली.

वडाळा मतदारसंघात भाजपाचे कालिदास कोळंबकर विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी श्रद्धा जाधव यांचा २४ हजार ९७३ मतांनी पराभव केला. कोळंबकर यांना ६६ हजार ८००, तर जाधव यांना ४१ हजार ८२७

मतं मिळाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्नेहल जाधव तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या. त्यांना ६ हजार ९७२ मतं मिळाली.

शिर्डी मतदारसंघात भाजपाचे राधाकृष्ण विखे पाटील विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या प्रभावती घोगरे यांना ७० हजार २८२ मतांनी पराभूत केलं. विखे पाटील यांना १ लाख ४४ हजार ७७८ तर घोगरे यांना ७४ हजार ४९६ मतं मिळाली. अपक्ष उमेदवार राजेंद्र पिपडा तिसऱ्या क्रमांकावर राहिले. त्यांना १ हजार ५१० मतं मिळाली.

सातारा मतदारसंघात भाजपाचे शिवेंद्रराजे भोसले विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अमित कदम यांचा १ लाख ४२ हजार १२४ मतांनी पराभव केला. भोसले यांना १ लाख ७६ हजार ८४९, तर कदम  यांना १ लाख  ४२ हजार १२४ मतं मिळाली. वंचित बहुजन आघाडीचे बबन करडे तिसऱ्या क्रमांकावर राहिले. त्यांना २ हजार ७७२ मतं मिळाली.

कणकवली मतदारसंघात भाजपाचे नितेश राणे विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संदेश पारकर यांचा ५८ हजार ७ मतांनी पराभव केला. राणे यांना १ लाख ८ हजार ७, तर पारकर यांना ५० हजार ३६२ मतं मिळाली. अपक्ष उमेदवार गणेश माने तिसऱ्या क्रमांकावर राहिले. त्यांना १ हजार १४४ मतं मिळाली.

पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघात भाजपाचे सुनील कांबळे विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे रमेश बागवे यांचा १० हजार ३२० मतांनी पराभव केला. कांबळे यांना ७६ हजार ३२, तर बागवे यांना ६५ हजार ७१२ मतं मिळाली. वंचित बहुजन आघाडीचे निलेश अल्हट तिसऱ्या क्रमांकावर राहिले. त्यांना ८ हजार ८६९ मतं मिळाली.

पालघर मतदारसंघात शिवसेनेचे राजेंद्र गावीत विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जयेंद्र दुबळा यांचा ४० हजार ३३७ मतांनी पराभव केला. गावीत यांना १ लाख १२ हजार ८९४, तर दुबळा यांना ७२ हजार ५५७ मतं मिळाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नरेश कोरडा तिसऱ्या क्रमांकावर राहिले. त्यांना १० हजार ६४३ मतं मिळाली.

बोईसर मतदारसंघात शिवसेनेचे विलास तरे विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी बहुजन विकास आघाडीचे राजेश पाटील यांचा ४४ हजार ४५५ मतांनी पराभव केला. तरे यांना १ लाख २६ हजार ११७, तर पाटील यांना ८१ हजार ६६२ मतं मिळाली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विश्वास वळवी तिसऱ्या क्रमांकावर राहिले. त्यांना ५० हजार ५७१ मतं मिळाली.

भिवंडी ग्रामीण मतदारसंघात शिवसेनेचे शांताराम मोरे विजयी झाले आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या लाडक्या बहिणी, भाऊ आणि शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मतदान करून महायुतीला निवडून दिलं असून समाजातल्या सर्व घटकांनी महायुतीच्या कामाची पोचपावती दिली आहे, त्यामुळे सर्व मतदारांचे मनापासून आभारी असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

**बाईट : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

विधानसभा निकालामध्ये महायुतीनं मुसंडी मारली असून हा विजय साजरा करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानाबाहेर शिवसेना कार्यकर्त्यांचा जल्लोष सुरु आहे.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीची मतमोजणी देखील आज होत आहे. सर्व ८१ मतदार संघांचे कल हाती आले आहेत. आतापर्यंत हाती आलेल्या कलांनुसार

झारखंड मुक्ती मोर्चा ३१, भाजपा २६, काँग्रेस १४, राष्ट्रीय जनता दल ४, माकपा मार्क्सिस्ट लेनिनिस्ट २, AJSUP १, लोकजनशक्ती रामविलास पक्ष, संयुक्त जनता दल आणि अपक्ष प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहे.

**<><><><><>**

**वरळी** मतदार संघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आदित्य ठाकरे मतमोजणीच्या चौदाव्या फेरीअखेर शिवसेनेचे मिलिंद देवरा यांच्यापेक्षा आघाडीवर आहेत.

**कुलाबा** मतदार संघात मतमोजणीच्या पंधराव्या फेरीअखेर भाजपाचे राहुल नार्वेकर त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे हिरा देवासी यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**माहीम** मतदार संघात मतमोजणीच्या बाराव्या फेरीअखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महेश सावंत त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेनेचे सदा सरवणकर यांच्यापेक्षा आघाडीवर आहेत.

**धारावीमधून** काँग्रेसच्या ज्योती गायकवाड यांचा विजय निश्चित झाला आहे.

**मलबार हिल** मधून एकोणिसाव्या फेरीअखेर भाजपाचे मंगल प्रभात लोढा मतांनी आघाडीवर आहेत

**मुंबादेवी** मतदारसंघातून काँग्रेसचे अमिन पटेल शिवसेनेच्या शायना एन सी यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**जोगेश्वरी पूर्व** मतमोजणीच्या चौदाव्या फेरीअखेर **शिवसेनेच्या मनिषा वायकर** आघाडीवर आहेत. **दिंडोशी**मध्ये मतमोजणीच्या दहाव्या फेरीअखेर **शिवसेनेचे संजय निरुपम** आघाडीवर आहेत. **मालाड पश्चिममध्ये** मतमोजणीच्या पंधराव्या फेरीअखेर भाजपाचे विनोद शेलार त्यांचे प्रतिस्पर्धी **काँग्रेसचे अस्लम शेख** यांच्यापेक्षा आघाडीवर आहेत.

**घाटकोपर पूर्वमधून भाजपाचे पराग शहा** ३४ हजार ९९९च्या मताधिक्याने विजयी झाले आहेत.

**घाटकोपर पश्चिम**मध्ये मतमोजणीच्या तेराव्या फेरीअखेर **भाजपाचे राम कदम** आघाडीवर आहेत. **मानखुर्द शिवाजीनगर**मध्ये मतमोजणीच्या एकविसाव्या फेरीअखेर **समाजवादी पक्षाचे अबु आझमी** आघाडीवर आहेत.

**अणुशक्तीनगरमध्ये** मतमोजणीच्या सतराव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सना मलिक** आघाडीवर आहेत. **वांद्रे पूर्वमध्ये** मतमोजणीच्या सोळाव्या फेरीअखेर **शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वरुण सरदेसाई** आघाडीवर आहेत. **वांद्रे पश्चिममध्ये** मतमोजणीच्या चौदाव्या फेरीअखेर **भाजपाचे आशिष शेलार** आघाडीवर आहेत.

**दापोलीमध्ये** मतमोजणीच्या सत्ताविसाव्या फेरीअखेर **शिवसेनेचे योगेश कदम** आघाडीवर आहेत. **गुहागरमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव** यांनी निर्णायक आघाडी मिळवली आहे. **रत्नागिरीमध्ये** मतमोजणीच्या तेविसाव्या फेरीअखेर **शिवसेनेचे उदय सामंत** आघाडीवर आहेत. **राजापूरमध्ये शिवसेनेचे किरण सामंत** मतमोजणीच्या सतराव्या फेरीअखेर आघाडीवर आहेत.

**कणकवलीमध्ये भाजपचे नितेश राणे** विजयी झाले आहेत. **कुडाळमध्ये** मतमोजणीच्या विसाव्या फेरीअखेर **शिवसेनेचे निलेश राणे** आघाडीवर आहेत. **सावंतवाडीमध्ये शिवसेनेचे दिपक केसरकर** विजयी झाले आहेत.

**श्रीवर्धनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या अदिती तटकरे** यांचा तर **महाडमध्ये शिवसेनेचे भरत गोगावले** यांचा विजय झाला आहे.

**<><><><><>**

**अक्कलकुवा** मतदारसंघात मतमोजणीच्या १७ व्या फेरीअखेर शिवसेनेचे अमशा पाडवी हे काँग्रेसचे के सी पाडवी यांच्यापेक्षा आघाडीवर आहेत.

**नंदुरबार** मतदार संघात मतमोजणीच्या १५ व्या फेरीअखेर भाजपाचे विजयकुमार गावित हे काँग्रेसचे किरण तडवी यांच्या पेक्षा ४९ हजार ३६८ मतांनी आघाडीवर आहेत.

**धुळे** मतदार संघात मतमोजणीच्या १३ व्या फेरीअखेर भाजपाचे अनुप अगरवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल गोटे यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**शिंदखेडा** मध्ये मतमोजणीच्या १७ व्या फेरीअखेर भाजपाचे जयकुमार रावल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे संदीप बेडसे यांच्यापेक्षा आघाडीवर आहेत.

**जळगाव ग्रामीण** मतदार संघात १८ व्या फेरीनंतर शिवसेनेचे उमेदवार गुलाबराव पाटील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गुलाबराव देवकर यांच्यापेक्षा आघाडीवर आहेत.

**जामनेर** मतदार संघात १९ व्या फेरीअखेर भाजपाचे गिरीश महाजन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे दिलीप खोडपे यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**मुक्ताईनगर** मतदार संघात मतमोजणीच्या १३ व्या फेरीनंतर शिवसेनेचे चंद्रकांत पाटील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार रोहिणी खडसे यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

**मराठवाड्यातल्या प्रमुख मतदार संघातली परिस्थिती पाहूया..**

**बीड** जिल्ह्यात **परळीत** मतमोजणीच्या १५ व्या फेरीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राजसाहेब देशमुख यांच्यापेक्षा ८८हजार ६५९ मतांनी आघाडीवर.

**आष्टी** मधून २२ व्या फेरीनंतर भाजपाचे सुरेश धस हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मेबूब शेख यांच्यापेक्षा ७० हजार ९३६ मतांनी  आघाडीवर आहेत.

**लातूर** शहरात मतमोजणीच्या १५ फेरीनंतर काँग्रेसचे अमित देशमुख हे भाजपच्या डॉक्टर अर्चना चाकूरकर यांच्या आघाडीवर आहेत.

**लातूर ग्रामीण**मध्ये  १४ व्या फेरीनंतर भाजपाचे रमेश कराड काँग्रेसचे धीरज देशमुख यांच्यापेक्षा आघाडीवर आहेत.

**परांडा** मधून शिवसेनेचे तानाजी सावंत आघाडीवर आहेत.

कराड दक्षिण मधून भाजपाचे अतुल भोसले आघाडीवर असून त्यांनी माजी मुख्यमंत्री काँग्रेसच्या पृथ्वीराज चव्हाण यांना मागे टाकलं आहे.

पाटण मधून मतमोजणीच्या १४ व्या फेरीअखेर शिवसेनेचे शंभुराज देसाई आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रातील नांदेड आणि केरळमधील वायनाड लोकसभेच्या पोटनिवडणुकीची मतमोजणी ही सुरू आहे. नांदेडमध्ये भाजपचे संतुकराव हंबर्डे त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे उमेदवार रविंद्र चव्हाण यांच्यापेक्षा १५ हजार ३२१ मतांनी आघाडीवर आहे.

केरळच्या वायनाड इथं काँग्रेसच्या प्रियांका गांधी या कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे सत्येन मोकरी यांच्यापेक्षा ४ लाख ८० हजार ३६ मतांनी ३६ मतांनी आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

डीआरआय अर्थात  महसूल गुप्तचर संचालनालयानं मुंबई विमानतळावर  काल केलेल्या कारवाईत एक संशयिताला सुमारे ३५ कोटी रुपये किमतीचं  सुमारे साडे

तीन किलो कोकेन बाळगल्याप्रकरणी अटक केली. हा संशयित लायबेरियाचा नागरिक असून त्याच्या सामानात अमली पदार्थांची दोन मोठी पाकिटे सापडली. जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीनं महसूल गुप्तचर संचालनालयानं अमली पदार्थांच्या तस्करांविरोधात कडक कारवाई सुरु केली आहे.

//<><><><><>//